दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरुवार दि.१८ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय–एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक ११६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Thursday 18 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 116 • Pages 4 • Rate 4 Rs


## माणिकराव कोकाटे यांनी दिला राजीनामा

**मुंबई–**राज्याचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात नाशिक जिल्हा न्यायालयाने अटक वॉरंट जारी केल्याने राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सदनिका घोटाळा प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्यानंतर हा महत्त्वपूर्ण टप्पा समोर आला असून आता माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिला असल्याची माहिती समोर आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माणिकराव कोकाटे यांचे क्रीडा खाते काढण्याची शिफारस राज्यपालांकडे केली होती. त्यानंतर आता कोकाटे यांचे खाते हे उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे देण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच आता हे खाते कोणाकडे दिले जाणार याचा निर्णय हा अजित पवार यांच्याकडे असणार आहे. त्यामुळे क्रीडा खाते कोणाकडे दिले जाणार याकडे देखील सर्वांचे लक्ष असणार आहे.

# एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार असतील तर आनंदच

## तर देवेंद्र फडणवीस पंतप्रधान होतील–अब्दुल सत्तार

### भाजपसोबत युती होणार नाही

**अब्दुल सत्तार म्हणाले की, सिल्लोडमध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये आमची भाजपसोबत युती होणार नाही. भाजप आमच्याविरोधात सर्व पक्ष घेऊन लढत आहे. एकटा भाजप तिथे आमच्याविरोधात लढू शकत नाही. एमआयएम आणि भाजनप सिल्लोडमध्ये एकत्र आले आहेत. तिथे भाजपचा एकाधा नगरसेवक निवडून येईल बाकी सर्व नगरसेवक आमच्या शिवसेनेचे निवडून येतील. गेली ४३ वर्षे सिल्लोड माझ्यासोबत आहे मी कोणत्याही पक्षात गेलो तरीही लोकं माझ्यासोबत असतात.**

**नागपूर (वृत्तसंस्था)–**प्रकाश आंबेडकर हे जे बोलले आहेत ती काळाची गरज आहे. माझा नेता मुख्यमंत्री होणार असेल तर त्यांच्या तोंडात मी पेढा टाकायला हवा. त्यांचे आभार मानायला हवे. शेवटी ते ज्येष्ठ नेते आहेत. प्रकाश आंबेडकर यांना काही तरी समजत असेल म्हणून ते बोलत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मुख्यमंत्री होतील असे म्हटले यावर बोलताना बोलताना शिवसेनेचे माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी असे म्हटले आहे.अब्दुल सत्तार म्हणाले की, पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठी माणूस पंतप्रधान होईल असे म्हटले आहे. महाराष्ट्रातील कोणताही पुढारी जर पंतप्रधान झाला तरी आम्हाला त्याचा आनंद होईल. पृथ्वीराज चव्हाण बोलले म्हणजे त्यांना काही तरी माहिती असेल म्हणूनच ते बोलले असतील. सध्या जर बघितले तर देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आणि भाजपचे वरीष्ठ नेता म्हणून चांगले काम करत आहे. ते देशाचे पंतप्रधान होऊ शकतात. अब्दुल सत्तार म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांची खूर्ची रिकामी झाली तर त्यांच्या जागी मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांची निवड होऊ शकते. पण पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या विधानात किती सत्यता आहे हे पाहावे लागेल. ज्या वेळेस घडायचे ते दिल्लीमधून घडते. दिल्लीत काय घडते हे माझ्यापेक्षा जास्त पृथ्वीराज चव्हाण यांना चांगल्या पद्धतीने माहिती असते. ते जे बोलले त्यात किती सत्य आहे हे आपण १९ तारखेला पाहून घेऊ.



### ..तर एकनाथ शिंदे नक्कीच मुख्यमंत्री होतील

**अब्दुल सत्तार म्हणाले की, शरद पवार हे देशातील ज्येष्ठ नेते आहेत. सर्व पक्षीय नेते त्यांचे मार्गदर्शन घेत असतात. त्यांच्याइतका राजकारणाचा अभ्यास देशात आता काहीच लोकांना आहे. ते जर काही बोलत असतील तर एकनाथ शिंदे नक्कीच मुख्यमंत्री होतील. मुस्लीम मते ही कोणत्या एका पक्षाची नाहीत ती विकासाच्या मागे असतात. सामाजिक आणि धामिर्क भावना जपणाऱ्यांसोबत ही मते राहतात. माजी खासदार जलील यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यावर बोलू नये.**

# घरकुल योजनेत गंभीर गैरव्यवहाराचा आरोप

## ग्रामविकास अधिकाऱ्याने लाभार्थ्यांकडून लाखो रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील कदमाचीवाडी (ता. लोहा) येथे घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, संबंधित ग्रामविकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांकडून लाच घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी बाळु बालाजीराव येंडाळे (रा. कदमाचीवाडी) यांनी लोहा पंचायत समितीतील गटविकास अधिकारी तसेच जिल्हा परिषद नांदेड यांच्या मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.



तक्रारीनुसार, कदमाचीवाडी येथील ग्रामविकास अधिकारी रमेश शिवाजी राठोड यांनी तुमचे घरकुल बिल लगेच टाकून देतो असे सांगत बाळु येंडाळे यांच्याकडून तब्बल ६ हजार रुपये लाच स्वीकारल्याचा आरोप आहे. गावात आशा भरपुर व्यक्ती कडुन पैसे काडुन गोरगरिब जनतेला फसवण्याच काम केलेले आहे आस सांगण्यात आहे. लाच घेतल्यानंतरही अद्याप घरकुलचे बिल टाकण्यात आलेले नसल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे.


इतकेच नव्हे, तर संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्याने गावातील सुमारे ५० पेक्षा अधिक लाभार्थ्यांकडून प्रत्येकी ६ हजार रुपये याप्रमाणे रुपये वसूल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या लाभार्थ्यांचीही आजपर्यंत घरकुल बिले टाकण्यात आलेली नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यामुळे घरकुल योजनेचा लाभ गरजू नागरिकांपर्यंत पोहोचत नसून, यात गरिब कुटुंबीयाचे घरकुल बिल काढलेले नाहित.काही लोकांनी घरे बांधकाम करुन पैसे खात्यात जमा होत नसल्याचे दिसून येत आहे.लाभार्थी आर्थिक व मानसिक त्रास सहन करत आहेत.या प्रकरणी तक्रारदार बाळु येंडाळे यांच्यासह इतर लाभार्थ्यांनी संबंधित ग्रामविकास अधिकारी यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्यात यावी, माझे घरकुल बिल तात्काळ मंजूर करण्यात यावे, तसेच गावातील इतर लाभार्थ्यांकडून घेतलेल्या पैशांची संपूर्ण चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी लेखी अर्जाद्वारे केली आहे.या गंभीर आरोपांमुळे लोहा तालुक्यात खळबळ उडाली असून, प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. घरकुल योजनेसारख्या महत्त्वाच्या शासकीय योजनेत जर अशा प्रकारचा भ्रष्टाचार होत असेल, तर गरीब व गरजू लाभार्थ्यांनी न्याय कुणाकडे मागायचा, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.आता तरी पंचायत समिती व जिल्हा परिषद प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन त्वरित चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.

# जीवाचीवाडी येथे विहीर लाभार्थी निवडीत गैरप्रकार ; ग्रामसभा घेण्याची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

जीवाचीवाडी ता.केज, जि.बीड येथे विहीर योजनेअंतर्गत लाभार्थी निवड प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत गटविकास अधिकारी यांच्या प्रतिनिधी समक्ष ग्रामसभा घेऊन व्हिडीओ चित्रीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या वापराची सखोल चौकशी करण्याची मागणीही पुढे आली आहे.यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते सुभाष सखाराम सारुक जीवाचीवाडी यांनी संबंधित प्रशासनाकडे लेखी अर्ज सादर केला आहे.अर्जात नमूद केल्याप्रमाणे,योग्य लाभार्थ्यांना विहिरींचा लाभ देण्याबाबत अनेक वेळा मागणी करूनही सरपंच व सरपंच पती कडून अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचा आरोप आहे.तसेच ग्रामसभेत उपस्थित राहण्यास अडथळेआणले जात असून,पोलीस बंदोबस्तात ग्रामसभेत जाण्याची परवानगी द्यावी,अशीही मागणी करण्यात आली आहे.



गावातील नागरिकांना पंधराव्या वित्त आयोगा अंतर्गत झालेल्या कामांची माहिती मिळत नसल्याचे सांगून,ग्रामपंचायतीचा कारभार कागदोपत्रीच चालत असल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे.जीवाचीवाडी हे डोंगराळ भागातील गाव असून बहुतांश शेतकरी अडचणीत असल्याने, काही गावकऱ्यांवर हाताशी धरून सरपंच पतीकडून दबाव टाकला जात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.या प्रकरणी ग्रामविकास अधिकारी यांच्याप्रतिनिधी मार्फत ग्रामपंचायतीची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच योग्य लाभार्थ्यांना विहिरींचा लाभ द्यावा, अशी मागणी अर्जदार व ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाकडून यावर काय कारवाई होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# चिंचोली माळी येथे रोहन गलांडे यांचे बेमुदत आमरण उपोषण सुरू

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

चिंचोली माळी ता.केज येथे विविध प्रलंबित नागरी व शासकीय मागण्यांच्या पूर्ततेसाठी रोहन गलांडे यांनी बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७-३० वाजता संत नामदेव महाराज मंदिर येथे ते उपोषणास बसले आहेत. चिंचोली माळी येथील उर्वरित अतिक्रमण तात्काळ हटवून छत्रपती संभाजी महाराज चौक (नागबेट वस्ती) ते संत नामदेव महाराज मंदिरा पर्यंत रस्ता व नालीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे,अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे.तसेच केज तालुक्यातील विहीर, गायगोठा व घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावेत,अशी मागणीही उपोषणातून करण्यात आली आहे.यासोबतच चिंचोली




माळी ग्रामपंचायत हद्दीतील नामदेव महाराज परिसरातील अतिक्रमण हटविणे,येथील कर्मवीर विद्यालयाच्या २००५ ते २०२५ या कालावधीतील निवेदनांवरील मागण्यांची चौकशी करून कार्यवाही करणे,प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या व नव्या इमारतींच्या बांधकाम व पुनर्विकासासाठी २०१५ ते २०२५ या कालावधीत प्राप्त व खर्च झालेल्या निधीची माहिती देऊन चौकशी करणे, महाडीबीटी अनुदानाचे प्रलंबित लाभ शेतकऱ्यांना तात्काळ देणे,गायरान परिसरातील सौरऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.दि.११ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे सादर केलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात, तसेच चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तातडीने सुरू करण्यात यावे,या मागण्यांसाठीच हे आमरण उपोषण सुरू करण्यात आल्याचे रोहन गलांडे यांनी सांगितले आहे.मागण्या मान्य होई पर्यंत उपोषण सुरूच राहील,असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# काशीदवाडी,नागझरी येथे स्व.गोपीनाथराव मुंडे यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती निमित्त येवता जिल्हा परिषद सर्कल मधील मौजे काशीदवाडी व नागझरी येथे विविध सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली.या निमित्ताने काशीदवाडी व नागझरी येथील जिल्हा परिषद शाळा तसेच वस्ती शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.भाजपाचे नेते विष्णू भाऊ घुले यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला चालना मिळावी व लोकनेत्यांच्या सामाजिक विचारांची जपणूक व्हावी, या उद्देशाने हा कार्यक्रम राबवण्यात आला.



यावेळी काशीदवाडी व नागझरी येथील सरपंच, उपसरपंच ,ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन,व्हाईस चेअरमन,प्रमुख कार्यकर्ते तसेच भाजपाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला.हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चंदुलाल मिसाळ यांनी सहकार्य केले.

# संतोष वर्मा यांना बडतर्फ करून कारवाई करा ब्राह्मण संघर्ष समितीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

एक उच्च पदस्थ अधिकारी जो संपूर्ण जिल्हा सांभाळताना त्या जिल्ह्यातील सर्व जाती, धर्म,पंथ यांना सांभाळून घेऊन काम करणारा असावा व तठस्थपणे न्याय देणारा असावा असे अभिप्रेत असताना जातीय द्वेष मनात ठेवून जो काम करतो तो या पदाच्या पात्रतेचा नाही त्याने एका कार्यक्रमामध्ये ब्राह्मण मुली त्याच्या पोराला दान करत नाही किंवा संबध ठेवत नाही तोपर्यंत आरक्षण चालू ठेवलं जावे असे म्हणताना त्याला घटनेचा पण विसर पडला व त्याच्या मनात असणारा ब्राह्मण द्वेष उफाळून आला असा व्यक्ती अशा पदावर लायक नाही म्हणून त्याला कायमचे बडतर्फ करून कायदेशीर कठोर कारवाई करावी ज्यामुळे पुन्हा कोणी दुसरा अधिकारी असं कृत्य करणार नाही अशी कठोर शिक्षा करण्याची मागणी राष्ट्रपती महोदयांना केज तहसीलदार यांचे मार्फत निवेदन देऊन केली आहे

महसूलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांना निवेदन देताना श्रीनिवासकेजकर, अनंत कोकीळ,श्रीधर खोत,ऋषिकेश जोशी, शिवराज मुथळे,सचिन जोशी,धनंजय कुलकर्णी आदी समाज बांधव यावेळी उपस्थित होते.



संपादकीय

# संक्रांत कोणावर ?

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाने अपेक्षेप्रमाणे सोमवारी जाहीर केल्याने राज्यात 'महापालिकांचा महासंग्राम' सुरू झाला आहे. त्यात आता मकर संक्रांतीपर्यंत खंड पडणार नाही. या वर्षाची संक्रांत कोणावर आणि तीळगूळ कोणाला, ते संक्रांतीनंतर दोन दिवसांनी ईव्हीएम मशीनमधूनच उघड होईल. महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन नॉनस्टॉप सात दिवस चालवण्याचं सरकारने कामकाज सल्लागार समितीत संमत करून घेतलं, तेव्हाच १४ डिसेंबरनंतर कोणत्याही क्षणी महापालिकांच्या निवडणुका जाहीर होणार, हे स्पष्ट झालं होतं .अन्यथा, नागपूरच्या मनमौजी थंडीत कोण कशाला रविवारीही कामकाज ठेवेल? सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २६ जानेवारीपूर्वी आटोपण्याचे आदेश दिले आहेत. नगर परिषदा आणि नगरपंचायतींचं मतदान झालं असलं, तरी अद्याप मतमोजणी आणि निकाल जाहीर होणं शिल्लक आहे. त्याबाबतही न्यायालयाने आदेश दिले आहेत. पण, त्या आदेशांबाबतच प्रशासकीय यंत्रणेच्या मनात गोंधळ आहे. त्या गोंधळाचं निराकरण झालं, की ते निकाल लागतीलच. पण, तोपर्यंत सगळ्यांचं लक्ष महानगरपालिकांच्या निवडणुकांकडे लागलं असेल. सर्वच राजकीय पक्षांसाठी शक्तिप्रदर्शनाची ही उत्तम संधी आहे. विद्युतवेगाने नागरिकरण सुरू असलेल्या महाराष्ट्रातल्या महानगरी मतदाराच्या मनात आपलं स्थान नेमकं काय आहे, हे साऱ्या देशाला दाखवून देण्याची संधी महाराष्ट्रातल्या विविध पक्षांच्या नेत्यांना यानिमित्ताने मिळाली आहे. त्यासाठी त्यांनी व्यूहरचना कधीचीच करून ठेवली आहे. आता साधनसामग्रीसह मैदानात उतरणं तेवढं बाकी आहे.नगर परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत जो राजकीय गोंधळ दिसला, तसाच गोंधळ या निवडणुकांतही बघायला मिळणार आहे. महाविकास आघाडी राज्यातून संपल्यात जमा आहे. आघाडीला धरून ठेवणारी शरद पवार नावाची शक्तीच आघाडीतून बाहेर पडली आहे. त्यांनी महाविकास आघाडीतील आपल्या तुटल्या तुकड्यासोबत निवडणुकीत युती करण्याचं नक्की केलं आहे. भारतीय जनता पक्षाचे सर्वोच्च चाणक्य अमित शहा यांनीही या जुळवाजुळवीला कालच दिल्लीत संमती दिली आहे. शरद पवार आणि अजित पवार या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन तुकड्यांत अजित पवार यांचा तुकडा सध्या चांगलाच ताकदवान आहे. अजितदादा स्वतः उपमुख्यमंत्री आहेत. त्यांना दिल्लीत अजून मंत्रीपद मिळालं नसलं, तरी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना तेल आणि नैसर्गिक वायूशी संबंधित तालेवार समितीचं अध्यक्षपद मिळालं आहे. पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांचा दिल्लीच्या वर्तुळातला वावर सहजपणे होतो आहे. त्यामुळे या दोन पक्षांत जुळवून घेण्याची गरज सर्वाधिक शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला वाटायला हवी. पण, दिसतं आहे ते वेगळंच. दुसऱ्या गटाबरोबर जुळवून घेण्याबाबत अजित पवार गटच जास्त उत्सुक दिसतो आहे. कारण, दोन तुकड्यांत हा गट ताकदवान असला, तरी महायुतीत प्रतिष्ठेने राहायचं, तर या निवडणुकीत जे बळ दाखवावं लागणार आहे, ते शरद पवार यांच्या तुकड्याच्या सहकार्याशिवाय शक्य नाही, हे त्यांना समजून चुकलं आहे. तटकरे आणि पटेल यांनी म्हणूनच शहा यांची भेट घेऊन त्यांच्याकडून या सहकार्याला संमती मिळवली. शरद पवार गटाचे कार्यकर्ते राज्यात सध्या निर्नायकी अवस्थेत आहेत. खुद्द पवार यांना वय आणि आजारपण यामुळे अन्य नेत्यांच्या तडफेने राजकारण करणं केवळ अशक्य आहे. त्यांच्याशिवाय त्या पक्षात पक्षावर प्रभाव पाडेल, पक्षसंघटनेला एकत्र बांधून ठेऊ शकेल, असा दुसरा नेता नाही. हे खुद्द शरद पवार यांना सर्वात आधी लक्षात आलं असेल. त्यामुळे, पक्ष अगदीच 'शून्या'त जाण्यापेक्षा आपल्याच पुतण्याशी समझोता करून (स्वतःला वेगळं ठेऊन) पक्ष महायुतीच्या वाहत्या प्रवाहात सोडून देण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला दिसतो. शरद पवार आणि शहा यांच्यातल्या एकेरी सामन्यात हा अंतिमतः शहा यांचाच विजय असल्याने तटकरे आणि पटेल यांना परवानगी मिळवणं अगदीच सोपं गेलं असणार. शेवटी, 'करून दाखवलंच' म्हणून त्यांनी शहा यांची शाबासकीही मिळवली असेल!पण, तरीही यात एक अडचण आहेच. नवाब मलिक. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कोणत्याही परिस्थितीत नवाब मलिक यांचा चेहरा महायुतीत दिसायला नको आहे. भाजपला मुस्लीमबहुल मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसला लढवायचं आहे. त्यामुळे, राष्ट्रवादीला त्यांना पूर्ण सोडायचंही नाही आहे. सना मलिक या राष्ट्रवादीच्या आमदार आहेत. त्यामुळे, राष्ट्रवादी मुंबईत महायुतीशी अप्रत्यक्ष समन्वयाने पन्नासेक जागा लढेल. असाच पुणे, पिंपरी–चिंचवड आणि आणखी काही ठिकाणचा अपवाद करत राष्ट्रवादी महायुतीत असेल. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसह! उबाठाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी युती नक्की केलीच आहे. पण, मुंबईच्या काँग्रेसला मनसे नको आहे. उबाठा आणि मनसे यांनी परस्परात जागा वाटपासह सर्वच गोष्टी नक्की केल्या आहेत. त्याची प्रचारनीती, घोषणा सगळंच ठरलं आहे. काँग्रेसशिवाय. त्यामुळे, महायुतीतल्या उरल्यासुरल्या काँग्रेसवर आपोआपच 'एकला चलो'ची वेळ आली आहे. त्यांचे जे नेते या भाषेत इतरांना इशारे देत होते, त्यांना आता मोठी संधी आहे. काँग्रेसमध्ये किती जण या स्थितीत संतुष्ट असतील आणि 'दिल्ली'ची पक्षाच्या या स्थितीबद्दल काय प्रतिक्रिया असेल, ते तेच जाणोत. थोडक्यात काय, मैदानात पाऊल टाकण्याआधीच महायुती आणखी बळकट झाली आहे. त्यांच्यासमोर संपूर्ण महाराष्ट्रात एकच एक असा प्रतिस्पर्धीच कुठे नसणार, हे आताच स्पष्ट झालं आहे!

# अर्थसहाय्यातून होणार शेतकऱ्यांची अर्थसमृद्धी!

## ग्लोबल विकास ट्रस्ट व AU स्मॉल फायनान्स बँकेचा संयुक्त उपक्रम; फळबाग लागवडीसाठी पात्र लाभार्थ्यांना कर्जाचे वितरण

दैनिक वादळ वार्ता
**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**



मराठवाडा हा विभाग कायम दुष्काळी म्हणून गणल्या जातो. इथे कधी दुष्काळ पडतो तर कधी इथे अतिवृष्टी होते. नैसर्गिक आपत्तींशी सामना करणारा शेतकरी कायम आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडलेला असतो. पारंपारिक शेतीतून मिळणारे उत्पन्न अतिशय तुटपुंजे असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनातील गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत शेतकरी शाश्वत शेतीतील नाविन्यपूर्ण बदल कसे स्वीकारणार? हा प्रमुख प्रश्न त्यांना भेडसावतो. यावर जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टने प्रभावी उपाय योजला असून फळबाग लागवड करण्यास इच्छुक असलेल्या गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना AU स्मॉल फायनान्स बँकेच्या सहकार्यातून आर्थिक सहाय्य केले जात आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथील १३ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना थेट गावात जाऊन आर्थिक सहाय्याचे वितरण करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. बुधवार, दि.१७ डिसेंबर रोजी गावातील हनुमान मंदिर येथे सदरील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फळबाग लागवड करून हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावलेले असून त्यांच्या आर्थिक स्थितीत अमूलाग्र बदल झालेले आहेत. यापुढे ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमांतून गावगावात शेतीचा शाश्वत विकास घडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार असून त्या संपूर्ण गावांचा कायापालट करण्याचा आपला संकल्प असल्याचे जलनायक मयंक गांधी यांनी म्हटले आहे. पठाण मांडवा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

याबाबत सविस्तर असे की, ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश असून, शेतकऱ्यांना लागणारे मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य संस्थेकडून मोफत उपलब्ध करून देण्यात येते. चार हजार गावांतील जवळपास तीस हजार शेतकरी संस्थेसोबत जोडले गेलेले आहेत. टाटा सामाजिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दहा पटीने वाढल्याचे दिसून आलेले आहे. कापूस, सोयाबीन आणि तत्सम पिकांच्या आधारावर शेतकरी जगूच शकत नाही. शेतीची पारंपरिक पद्धती बदलून आधुनिक शेतीच्या सहाय्याने आर्थिक उत्पन्नात वाढ होऊ शकते, मात्र त्यासाठीही सुरुवातीला पैशांची अडचण येते. आर्थिक संकटातील शेतकऱ्यांसाठी पैशांशिवाय हा नवा बदल करणे अशक्य असल्याची बाब लक्षात घेता ग्लोबल विकास ट्रस्ट आणि AU स्मॉल फायनान्स बँकेच्या संयुक्त विद्यमाने गरजू पात्र शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्यात येत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मांडवा पठाण गावातून या उपक्रमाचा बुधवारी शुभारंभ करण्यात आला. पठाण मांडवा गावातील एकूण ६८ शेतकऱ्यांनी आवेदन केले होते त्यापैकी आज पहिल्या दिवशी १३ पात्र शेतकऱ्यांना नव्याने फळबाग लागवडीसाठी प्रति शेतकरी एकरी १ लाख २० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. AU बँकेचे विभागीय अधिकारी दिलीप जीवने, स्वप्निल राडीकर, नागनाथ मुंडे, संदीप बाबर, केशव गव्हाणे, विशाल राठोड आदींनी उपस्थित राहून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी मदत केली.

**शेतकऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य – मयंक गांधी**

शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणणे हेच आपले एकमेव ध्येय आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांमध्ये बदलाची तीव्र भावना दिसून येत असून पारंपारिक शेतीला कंटाळलेले शेतकरी आधुनिक शेतीकडे मोठ्या प्रमाणावर वळू लागले आहेत. नव्याने फळबाग लागवड करण्याची इच्छा असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक अडचण असल्याचे कारण मागील काळात अनेक शेतकऱ्यांनी बोलून दाखवले होते. यावर आम्ही प्रभावी तोडगा शोधला आहे. कुठलीही बँक बिड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्ज तयार नव्हती. आम्ही AU स्मॉल फायनान्स बँकेला शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याची विनंती केली. परतफेडीबाबत त्यांना खात्री दिली, यापूर्वीही हा प्रयोग यशस्वी झाल्याचे उदाहरण त्यांच्यासमोर मांडले असता ते तयार झाले असून याचा जवळपास १ हजार शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याचे ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले.

# वसा आणि वारसा! माजी आमदार स्व.अर्जुनसिंग वळवी यांच्या पुतणी ॲड.सोनाली वळवी यांचा राष्ट्रवादीत (अजित पवार गट) जाहीर प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आदिवासी हक्क आणि अधिकारांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे, तळोदा–अक्कलकुवा विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार स्व. अर्जुनसिंग पिरसिंग वळवी यांचा राजकीय व सामाजिक वारसा आता त्यांच्या पुढच्या पिढीने खंबीरपणे हाती घेतला आहे. स्व. वळवी यांच्या पुतणी ॲड.सोनाली वळवी यांनी दिनांक १६ रोजी आपल्या समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) जाहीर प्रवेश केला. भरत गावित यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

ॲड.सोनाली वळवी या ॲड.नकुल वळवी आणि तळोदा पंचायत समितीच्या माजी सभापती पुष्पाताई नकुल वळवी यांच्या कन्या आहेत. उच्चशिक्षित आणि कायदेशीर ज्ञान असलेल्या सोनाली वळवी यांच्या प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला जिल्ह्यात, विशेषतः आदिवासी पट्ट्यात एक नवा चेहरा मिळाला आहे. सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहून आदिवासींच्या प्रश्नांवर काम करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.




**आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवणे आणि स्व. काकांचा (अर्जुनसिंग वळवी) सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. –ॲड.सोनाली वळवी**

या पक्षप्रवेशावेळी केवळ ॲड.सोनाली वळवीच नव्हे, तर त्यांच्यासोबत अनेक तरुण वकील आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही पक्षप्रवेश केला. यामध्ये प्रामुख्याने:

ॲड. विलेंद्र वसावे,ॲड.चेतन वसावे,ॲड.फिलिप मावची,रोहिदास वळवी,सुरेश वसावे,विवेक पाडवी यांचा समावेश होता. या सर्वांचे भरतदादा गावित यांनी पक्षाचा स्कार्फ घालून स्वागत केले.

**तळोदा–अक्कलकुवा राजकारणावर परिणाम:–** स्व. अर्जुनसिंग वळवी यांचे नाव आजही या भागात आदराने घेतले जाते. त्यांच्या कुटुंबातील सदस्य सक्रिय राजकारणात आल्याने जुन्या जाणत्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि विधानसभा क्षेत्रातील समीकरणांच्या दृष्टीने हा पक्षप्रवेश अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

# घरी तमालपत्र कसे वाढवावे?

तमालपत्र हे अनेक औषधी गुणधर्मांनी समृद्ध देखील आहे, म्हणून ते घरात अनेक प्रकारच्या देशी औषधांमध्येही वापरले जाते. तमालपत्र वाढवण्यासाठी आपल्याला जास्त जागेची आवश्यकता नाही, म्हणून आपण आपल्या घरातील कुंडीत ते सहजपणे वाढवू शकता. तर मग जाणून घेऊया ते कसे वाढवायचे.

फळांपासून ते भाज्या आणि औषधी वनस्पतींपर्यंत, घरी पिकवलेल्या वस्तू खाण्याची मजा वेगळी आहे. ते सेंद्रिय देखील आहेत, जेणेकरून रासायनिक नुकसानीची भीती नाही. फारच कमी लोक त्यांच्या घरात मसाले पिकवतात, परंतु बरेच मसाले सहज पिकवले जाऊ शकतात. त्याचप्रमाणे, आपण तमालपत्राचे रोप देखील लावू शकता. चला तर मग जाणून घेऊया सविस्तर.

**तमालपत्रांचे उपयोग**

अन्नाची चव आणि सुगंध वाढवण्याव्यतिरिक्त, तमालपत्रांचा वापर आरोग्याच्या अनेक समस्या टाळण्यासाठी केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ, अपचन, फुशारकी, सूज येणे यासारख्या समस्यांमध्ये ते फायदेशीर आहे. याशिवाय त्याच्या बंडलचा वापर संधिवात आणि न्यूरॅजिया दूर करण्यासाठी केला जाऊ शकतो. यात दाहक–विरोधी गुणधर्म आहेत आणि रक्तातील साखर नियंत्रण, खराब कोलेस्ट्रॉल आणि यूरिक ॲसिडसाठी देखील फायदेशीर आहे.

**तमालपत्र औषधी गुणधर्मांनी समृद्ध**

त्याच्या विशेष सुगंधाव्यतिरिक्त, तमालपत्र त्याच्या औषधी गुणधर्मांमुळे आयुर्वेदात देखील फायदेशीर मानले जाते. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या मते, तमालपत्रांमध्ये प्रामुख्याने फ्लेव्होनॉइड्स, टॅनिन, युजेनॉल, सायट्रिक ॲसिड, कार्बोहायड्रेट्स, स्टिरॉइड्स, अल्कलॉइड्स, ट्रायटरपेनोइड्स आणि आवश्यक तेले असतात. याशिवाय व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, लोह, कॅल्शियम, फायबर इत्यादी अनेक जीवनसत्त्वे–खनिजे यात आढळतात.



**योग्य जागेची निवड करा**

तुम्हाला घरी तमालपत्र वाढवायचे असेल तर सर्वात आधी तुम्ही त्याची कुंडी ठेवण्यासाठी योग्य जागेची निवड करणे गरजेचे आहे. तमालपत्राचे रोप उष्ण कटिबंधीय हवामानात म्हणजेच किंचित उबदार हवामानात योग्यरित्या वाढते. तमालपत्राचे भांडे अशा ठिकाणी ठेवले पाहिजे जेथे ६ ते ८ तास सूर्यप्रकाश असेल . जर तुम्ही ते घराच्या आत लावले तर उघड्या बाल्कनी, छप्पर किंवा खिडकीजवळ योग्य आहे.

**माती तयार करण्यासाठी टिपा**

कुंड्यात ५० टक्के बागेची माती, २५ टक्के शेणाचे खत किंवा गांडूळखत मिसळावे. याशिवाय १० टक्के कोकोपीट आणि १५ टक्के वाळू मिसळली पाहिजे.

**तमालपत्राचे रोप किंवा बियाणे पेरणे**

जर आपल्याला कुंडीत तमालपत्र वाढवायचे असेल तर रोप थेट नर्सरीमधून खरेदी केले जाऊ शकते किंवा ते कलम केले जाऊ शकते, ज्यासाठी आपल्याला परिपक्व स्टेमची आवश्यकता असेल, ज्यामध्ये फक्त तीन ते चार पाने जोडलेली असतात. गाठीपासून तिरपे खोड कापून पेन तयार करा व नंतर **ओलसर मातीत दोन ते तीन इंच खोलीपर्यंत लावावे.**

आपल्याला बियाण्यापासून तमालपत्राचे रोप वाढवायचे असेल तर आपण आदल्या रात्री बियाणे पाण्यात भिजवून ठेवले पाहिजे. यानंतर दुसऱ्या दिवशी सुमारे १ इंच खोलीवर बिया पेरावीत. माती जास्त ओली असता कामा नये. उगवणीसाठी फक्त ओलावा आवश्यक असतो. ते दोन ते तीन आठवड्यांत वाढतील.

**कापणी कधी योग्य**

जेव्हा तमालपत्राचे रोप थोडे वाढते आणि आपल्याला असे वाटते की त्यात इतकी पाने आहेत की ती तळापासून छाटली पाहिजे, तेव्हा आपण काही पाने तोडू शकता, ती फेकून देण्याऐवजी आपण त्यांचा कोरडा वापर करू शकता किंवा ताजे देखील वापरू शकता. आपल्याला बरीच पाने तोडायची आणि वाळवायची असतील तर आपल्याला वनस्पती सुमारे २ फूट होण्याची प्रतीक्षा करावी लागेल, ज्यास ८ महिने ते १ वर्ष लागू शकतात. हे वनस्पतीची काळजी, ती किती वेगाने वाढत आहे आणि पाने किती दाट येत आहेत यावर अवलंबून असते.तमालपत्रांची कापणी करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे त्यांना तीक्ष्ण कात्रीने तोडणे. ते खोडाच्या जवळून उपटले पाहिजे जेणेकरून तेथे नवीन पाने उगवतील. आपण आपल्या हातांनी पाने कापू शकता, परंतु आपण जास्त खेचून त्यांना तोडू नये.ते कोरडे करण्याचा एक चांगला मार्ग म्हणजे ते धुवून कागदाच्या टॉवेलवर पसरवणे आणि नंतर ते हवेशीर ठिकाणी पसरवून कोरडे करणे. सूर्यप्रकाशाचा थेट संपर्क टाळला पाहिजे. पाने उलटी करत रहा किंवा ती १ ते २ आठवड्यांत वाळण्यास तयार होतील. आपण गुच्छांना धाग्याने बांधून देखील बनवू शकता जे त्यांना लटकवून सहज वाळवले जाऊ शकतात.

# पालकमंत्री अजित दादा, आज बीडमध्ये होणारी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा नियमबाह्य

## शिवछत्रपती पुरस्कार घेणारे प्रा. जनार्दन शेळके यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी महाराष्ट्र खो खो असोसिएशनसह खेळाडूंची दिशाभूल केल्याने स्पर्धेवर बहिष्कार-प्रा.तानाजी आगळे/सौ.चित्रा आगळे

### खाजगी एमॅच्युअर खो-खो असोसिएशन मध्ये शासकीय अधिकारी आणि कर्मचारी..?

एमॅच्युअर खो-खो असोसिएशनची स्थापना मुळातच बोगस आहे. या असोसिएशन मध्ये ज्यांना पदाधिकारी म्हणून घेतले आहे ते बहुतांश शासकीय अधिकारी अथवा कर्मचारी आहेत. यामध्ये अध्यक्ष असलेल्या प्रमिला जनार्दन शेळके या वयोवृद्ध असून यांचा आणि खो खो खेळाचा कसलाही संबंध नाही. त्यांचा मुलगा ऋषिकेश जनार्दन शेळके जो प्रेसिडेंट म्हणून आहे तो बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षण विस्तार अधिकारी या पदावर कार्यरत आहे. सुहासिनी देशमुख या सहप्रसिडेंट असून ज्यावेळी संघटनेची स्थापना झाली त्यावेळी त्या बीड जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. कैलास गवते हे सहप्रसिडेंट असून ते पोलीस खात्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. सचिव म्हणून ज्यांना घेतले आहे ते विजय भागवत जाहेर हे जिल्हा परिषद ला शिक्षक आहेत.सहसचिव असलेले मनोज अशोकराव जोगदंड हे पोलीस खात्यात पोलीस कॉन्स्टेबल आहेत. तसेच दुसरे सहसचिव नितीन मुरलीधर येळवे हे जिल्हा परिषदेला शिक्षक आहेत. कोषाध्यक्ष असलेले योगेश दत्तात्रय सोळसे हे देखील बीड जिल्हा परिषदेला शिक्षक आहेत. सदस्य असलेले शिवराज अनंतराव देवगुडे हे शासकीय सेवेत क्लार्क म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय इतर पदाधिकारी देखील मैदानावरील खेळापेक्षा बाहेर कुठल्यातरी संस्थेची निगडित नोकरीमध्ये आहेत. हे सर्व सदस्य नियमबाह्यरित्या या संस्थेवर घेण्यात आलेले आहेत. ते ज्या शासकीय सेवेत कार्यरत आहेत त्या कार्यालयाचे, त्या विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता त्यांना पदाधिकारी,सदस्य म्हणून नियुक्त केले गेलेले आहे. ते शासकीय अधिकारी आणि कर्मचारी असतानाही ते खाजगी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य कसे झाले ?कोणाची परवानगी घेऊन झाले ? याची चौकशी संबंधित विभागाने करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे गरजेचे आहे.

दैनिक वादळ वार्ता

बीड । प्रतिनिधी

शिवछत्रपती पुरस्कार घेणारे प्रा. जनार्दन शेळके यांनी बीड जिल्हा खो खो असोसिएशन अस्तित्वात असताना बोगस एमॅच्युअर खो-खो संघटना वेगळी स्थापन केली. या संघटनेच्या नावाखाली त्यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्यासह बीडमध्ये ६१ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे आयोजन करून खेळाडूंची देखील दिशाभूल केली आहे. त्यामुळे या राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेवर बीड जिल्हा खो खो असोसिएशनचा बहिष्कार असून या गैरप्रकाराची चौकशी करून बोगस संस्था स्थापन करून त्यावर नियमबाह्य स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे अध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी कायदेशीर कारवाई करावी अशी रोखठोक मागणी पत्रकार परिषदेमध्ये बीड जिल्हा खो खो असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. तानाजी आगळे आणि सदस्य सौ. चित्रा आगळे यांनी केली आहे. बीड येथील त्यांच्या निवासस्थानी गुरुवार दिनांक १७ डिसेंबर रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी बोगस स्थापन केलेल्या एमॅच्युअर खो खो संघटनेचे संस्थापक अध्यक्ष यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, बीड जिल्हात खो खो



खेळाला एक वेगळा दर्जेदार इतिहास आहे. या खेळाच्या माध्यमातून मागील २५ वर्षांमध्ये अनेक खेळाडू राज्य, विद्यापीठ आणि राष्ट्रीय खेळाडू म्हणून तयार झाले. या खेळाच्या माध्यमातून अनेक खेळाडू पोलीस भरतीमध्ये, आर्मी भरतीमध्ये, तसेच शासकीय, निमशासकीय सेवेमध्ये मोठ्या संख्येने लागले आहेत. बीड जिल्हा खो खो असोसिएशन ही क्रीडा संघटना ऑगस्ट १९७६ पासून आज पर्यंत क्रियाशील असलेले एकमेव ४९ वर्षाची एकमेव संघटना आहे. या संघटनेचे स्थापनेपासून आजपर्यंत सचिव म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. जनार्दन शेळके हे स्वतः आहेत. ते या संघटनेचे संस्थापक सचिव असताना सुद्धा त्यांनी स्वत:च्या स्वार्थासाठी प्रसिद्धीच्या मोहापाई त्यांनी स्वत:ची वेगळी एमॅच्युअर खो खो संघटना दोन वर्षांपूर्वी स्थापन केली. यामागे त्यांचा कुटील डाव दिसत आहे. ज्यामुळे भविष्यात खो खो खेळाडूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. त्याचबरोबर खेळाच्या पवित्र मैदानावर अशा पद्धतीने चुकीचे पायंडे निर्माण झाले तर या चांगल्या खेळाला डाग लागेल. प्रा. जनार्दन शेळके यांचे कधीही मैदानाला पाय लागलेले नाहीत. ते आज ८० वर्षाचे वयोवृद्ध आहेत. केवळ चाचणी स्पर्धेत यायचे उद्घाटन करायचं, खेळाडूंना थातूरमातूर मार्गदर्शन करायचं आणि निघून जायचं. पुन्हा थेट पुढच्या वर्षीच्या स्पर्धेच्या वेळीच यायचे. असा यांचा खो-खो प्रवास आहे. त्यांच्या स्वार्थी प्रवृत्तीला आणि वयोमानानुसार थांबण्याचा सल्ला दिल्यामुळे त्यांचा इगो हर्ट झाला असावा त्यामुळेच त्यांनी बीड जिल्हा खो खो असोसिएशनचे स्वतः सचिव असताना सुद्धा या संघटनेला अंधारात ठेवून नियमबाह्य दुसरी एमॅच्युअर खो-खो संघटना स्थापन केली आणि या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची दिशाभूल करून मागील ४८ वर्षापासून महाराष्ट्र खो-खो असोसिएशनला असलेली बीड जिल्हा खो खो असोसिएशनची सलग्नता रद्द करून आता नव्याने स्थापन केलेल्या एमॅच्युअर खो खो असोसिएशनला नियमबाह्य संलग्नता मिळवली. हे नियमबाह्य असल्यामुळेच या प्रवृत्तीला विरोध करण्यासाठी आम्ही त्यांनी आयोजित केलेल्या ६१ व्या राज्यस्तरीय पुरुष महिला अजिंक्यपद खो-खो स्पर्धेवर बहिष्कार टाकत आहोत. या गंभीर बाबीची पालकमंत्री तथा महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे अध्यक्ष महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी स्वतः लक्ष घालून या नियमबाह्य स्पर्धेची चौकशी करून दोषीविरुद्ध कठोर कारवाई करावी. भविष्यात खेळाडूंची होणारी वाताहत थांबावी थांबवावी अशी मागणी देखील पत्रकार परिषदेत बीड जिल्हा खो खो असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा तानाजी आगळे व सदस्य सौ चित्रा आगळे यांनी केली आहे.

### एमॅच्युअर नव्हे तर शेळके असोसिएशन

प्रा. जनार्दन शेळके यांनी ज्या एमॅच्युअर खो-खो असोसिएशनची स्थापना केली. यामध्ये ते स्वतः सदस्य म्हणून आहेत तर त्यांची पत्नी प्रमिला शेळके या अध्यक्ष आहेत. त्यांचा मुलगा ऋषिकेश शेळके हा प्रेसिडेंट आहे. इतर जे पदाधिकारी आणि सदस्य म्हणून घेतले आहेत ते सर्व त्यांच्या जवळचे नातेवाईक आणि कानाखालचे पदाधिकारी असल्यामुळे हा बोगस असलेला एमॅच्युअर खो-खो असोसिएशन नसून शेळके लिमिटेड असोसिएशन आहे असा थेट आरोप केला आहे.

### पालकमंत्री, क्रीडामंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी चौकशी करणे गरजेचे..?

आज बीड शहरातील नामांकित श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलावर महाराष्ट्र खो खो असोसिएशन यांच्या मान्यतेने बोगस स्थापन करण्यात आलेल्या एमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीड द्वारा आयोजित ६१ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा होत आहे. १८ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान खो खो चा राज्यस्तरीय महासंग्राम बीडमध्ये होत आहे. ही बाब खेळाडूंच्या दृष्टीने आणि बीड जिल्ह्याच्या दृष्टीने आनंदाची असली तरी देखील दुसरीकडे या स्पर्धेचे आयोजन ज्यांनी केले त्यांनी महाराष्ट्र खो-खो असोसिएशन आणि बीड जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करून या स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. या नियमबाह्य बोगस संस्थेच्या नावावर स्पर्धा होत असल्याने याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषीविरुद्ध कठोर कारवाई करणे गरजेचे असल्यामुळे बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पालकमंत्री, महाराष्ट्राचे क्रीडा मंत्री, बीडचे जिल्हाधिकारी आणि बीडचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी गांभीर्य पूर्वक दखल घेऊन याची कठोर चौकशी करत दोषी विरुद्ध कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. तरच मैदानावरील अश्या चुकीच्या प्रवृत्तीला आळा बसेल.

---

## आई प्रेम, ममता व संस्कारांचा साहित्यिक सोहळा

### राज्यस्तरीय ‘आई’ विषयक काव्यसंग्रह प्रकाशन, काव्यसंमेलन व सन्मान कार्यक्रम पुण्यात दिमाखात संपन्न.सी ए.डॉ शंकर अंदानी यांचे भव्य आयोजन

दैनिक वादळ वार्ता

पुणे । प्रतिनिधी



आईच्या प्रेम, ममता, वात्सल्य व त्यागाला साहित्यिक अधिष्ठान देणाऱ्या ‘आई - प्रेम, ममता, वात्सल्य’ या राज्यस्तरीय प्रतिनिधिक काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा, राज्यस्तरीय आई विषयक काव्यसंमेलन, तसेच आदर्श कर्तृत्ववान माता सन्मान व आदर्श साहित्य सेवा सन्मान असा बहुआयामी साहित्यिक-सामाजिक कार्यक्रम पुण्यात उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम सीता ट्रस्ट असोसिएशन (सीता-साई इंडियन ट्रस्ट असोसिएशन ) यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाचे लेखक, संपादक, संकल्पक व आयोजक म्हणून मातृभक्त आचार्य सी.ए., प्रा. डॉ. शंकर धनशामदास अंदानी (अध्यक्ष सीता-साई ट्रस्ट) यांनी आयोजित केला होता व मुख्य महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या काव्यसंग्रहात ‘आई’ विषयावरील ११२१ मराठी कवितांचा प्रतिनिधिक समावेश आहे.या ग्रंथप्रकाशन सोहळ्याचे अध्यक्षपद पद्मश्री कर्मवीर मा. श्री. भिकू रामजी इदाते यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत थाटात संपन्न झाले. कार्यक्रमास योगसद्गुरू महामण्डलेश्वर डॉ. कृष्णदेव गिरिजी महाराज आणि यांचे पावन आशीर्वाद लाभले.

राज्यस्तरीय काव्यसंमेलन दुपारी ३.०० ते ५.३० या वेळेत प्रसिद्ध कवी मा. सौ.डॉ. पल्लवी बनसोडे, यांच्या अध्यक्षतेखाली,श्रीमती डॉ. मंदा ताई नाईक यांच्या पर्यवेक्षक अंतर्गत राज्यस्तरीय आई विषयक काव्यसंमेलन संपन्न झाले. या काव्यसंमेलनास पद्मश्री मा. डॉ. उदय देशपांडे यांची प्रमुख पाहुणे उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी पद्मश्री डॉ. उदय देशपांडे सर व सहकारी यांच्या मल्लखांब प्रात्यक्षिकाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे व मान्यवर म्हणून पद्मश्री सौ. राहिबाई पोपरे (बीजमाता), पद्मश्री डॉ. उदय देशपांडे, खासदार मेघाताई कुलकर्णी, मनीषाताई लडकत (अध्यक्ष, भाजपा महिला आघाडी - पुणे), प्रियंकाताई शेंडे-शिंदे (सरचिटणीस, भाजपा पुणे शहर), सौ रोहिणी राठोड(.प्रचार व प्रसिद्धी प्रमुख भा.ज पा पुणे),सुरेश राठोड (संचालक, इंडियन पोलीस मित्र भारत), डॉ. मंदा नाईक, डॉ. पल्लवी बनसोडे, डॉ. नीलांबर गानू, डॉ. शैलजा करोडे, आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात समाजासाठी प्रेरणादायी ठरलेल्या २१ मातांना आदर्श कर्तृत्ववान माता सन्मान आणि मराठी साहित्याची सेवा करणाऱ्या ११ कवी-कवयित्रींना आदर्श साहित्य सेवा सन्मान प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील व रुपाली पाठक यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. आई या विषयाला साहित्य, संस्कृती व समाजमूल्यांचे सखोल अधिष्ठान देणारा हा उपक्रम उपस्थित रसिक, साहित्यिक व मान्यवरांसाठी स्मरणीय ठरला.

---

## वाघाच्या हल्ल्यात गोरी ठार

### शंकरपूर परिसरातील पाच दिवसातीलच आणखी घटना

दैनिक वादळ वार्ता



चिमूर तालुक्यातील शंकरपूर परिसरात वाघाने ठार केलेल्या एकामागे एक चार दिवसा आड घटना घडत असून काल रात्री शंकरपूर पासून चार किमी अंतरावर असलेल्या खैरी येथे रात्री पहाटेच्या सुमारास वाघाने गावांमध्ये शिरून सुरेश भिवरकर यांच्या गोरीवर हल्ला करून ठार केले. त्यामुळे शेतामध्ये जाण्यासाठी भीती असतानाच गावामध्ये वाघ येत असल्यामुळे परिसरातील गावांमध्ये रात्रीमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता गेलेल्या सोमवारीच शंकरपूर ते कवडशी देश रोडवर पट्टेदार वाघाने शेषराव झाडे या इसमावर हल्ला करून ठार केले होते. ही घटना ताजी असतानाच त्याच परिसरात अवघ्या एक किमी अंतरावर असलेल्या खैरी येते काल रात्री वाघाने हा हल्ला केला. याची माहिती सकाळी होताच वनविभागाला फोनवरून पाचारण करण्यात आले. वन विभागाने घटनास्थळी येऊन घटनेचा पंचनामा केला व मृत गोरीला खड्डा खोदून दफन करण्यात आले. परंतु हा हल्ला पट्टेदार वाघाने केलेला नसून बिबट्याने केलेला असल्याचा निष्कर्ष वनविभागाचा आहे. कारण यापूर्वीही याच शेतकऱ्याची गाय काही महिने अगोदर बिबट्याने हल्ला करून मारली होती. त्यानंतर या परिसरात बिबट्याने प्रत्येक शेतशिवारात तसेच गावात शिरून पाळीव प्राण्यांना मारल्याच्या घटना सतत चार ते पाच दिवसा आड घडत आहेत. या परिसरात पट्टेदार वाघाने व बिबट्याने धुमाकूळ घातला असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी तसेच शेतमजूर शेतावर जाण्यास तयार नसले तरीही वाघ गावात येत असल्याने गावातील लोकांची झोपही उडाली आहे. शंकरपूर के भिशी परिसरात नरबळी घेणारे दोन वाघ जेर बंद करण्यात आले होते. परंतु परिसरात वाघाने घेतलेल्या नरबडी तसेच पाळीव प्राण्यांचा बळी यात कमी होत नसल्याने या वाघांचा तात्काळ बंदोबस्त करणे अत्यावश्यक झाले असल्याने याचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी परिसरातील नागरिक करीत असून यानंतर घटना घडल्यास मोठा संघर्ष होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

---

## ल्युमिनियम फॉईलमध्ये चपाती बांधताय?

दैनिक वादळ वार्ता



आजकाल अनेक जण सहज मिळत असलेल्या ल्युमिनियम फॉईलचा चपाती गुंडाळण्यासाठी वापर करत असतात. ऑफिसला जाताना लंच बॉक्समध्ये चपाती ओली होऊ नये म्हणूनही फॉईल वापरली जात असते. परंतू ही सवय आरोग्यासाठी घातक होऊ शकते असे म्हटले जात आहे. डॉ. तरंग कृष्णा यांच्या मते ल्युमिनियम फॉइलमध्ये गरमागरम भरलेल्या चपात्या किंवा बराच काळ ठेवलेल्या चपात्यातून आपल्या शरीरात ल्युमिनियम जमा होऊ शकते. त्यामुळे हळूहळू कॅन्सरसारख्या आजारांना हे निमंत्रण ठरु शकते. त्यामुळे चपात्यांना फॉईलमध्ये गुंडाळण्यापूर्वी डॉक्टरांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करणे महागात पडू शकते.

डॉक्टर तरंग कृष्णा यांनी त्यांच्या सोशल मीडियाच्या एका पॉडकास्टमध्ये पोस्ट केले आहे. त्यात त्यांनी सांगितले की फॉईलमध्ये चपाती गुंडाळू नये. ल्युमिनियम फॉईलमध्ये चपात्या गुंडाळल्याने याचे ल्युमिनियमचे कण शरीरात जात असतात. ज्यामुळे आपला इम्युन सिस्टीम डॅमेज होऊ शकते. हळूहळू त्यामुळे एक पाऊल कॅन्सरकडे जाऊ शकते.

डॉक्टर तरंग कृष्णा यांनी सांगितले की जर तुम्हाला तुमच्या जेवणास किंवा चपाती आणि भाकरी यांना गुंडाळून ठेवायचे असेल तर ल्युमिनियम फॉईलचा वापर करण्याऐवजी इतर रॅपिंग पेपरचा वापर करावा. डॉक्टर तरंग कृष्णा सांगतात की जागतिक आरोग्य संघटनेने ( थकज ) सांगितले की आहे जर तुम्ही ल्युमिनियम भांड्यात जेवण शिजवत असाल तर त्यास एक वर्षांनंतर बदला. जर तुम्ही असे केले नाही तर तुमच्या आरोग्यासाठी ते धोकादायक सिद्ध होऊ शकते आणि कॅन्सर सारख्या आजाराचा धोका वाढू शकतो.

---

## अर्धापूर तालुक्याची स्थिती झाली कागदं फिरवा अन् पैसे जिरवा

# शासनाच्या वित्त आयोगाचा निधी होतोय फक्त कागदावरच स्वाहा?

दैनिक वादळ वार्ता

अर्धापूर । प्रतिनिधी

| पाच वर्षातील स्थिती | |
|---|---|
| २०२०-२१ | ६ कोटी २२ लाख ३ हजार ७१० रुपये |
| २०२१-२२ | १० कोटी ९३ लाख ५८ हजार ८३ रुपये, |
| २०२२-२३ | १५ कोटी ६ लाख ५ हजार ४८६ रुपये |
| २०२३-२४ | १५ कोटी ४४ लाख २८ हजार १२० रुपये |
| २०२४-२५ | १४ कोटी ४५ लाख २६ हजार ९९७ रुपये |

तालुक्यातील ग्राम पंचायतीच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी दरवर्षी शासनाच्या वित्त आयोग योजनेंतर्गत स्थानिक गावातील लोकसंख्येच्या प्रमाणात लाखो रूपयांचा निधी ग्राम पंचायत स्तरावर मंजूर केला जातो. परंतू अर्धापूर तालुक्यातील जवळ पास सर्वच ग्राम पंचायती मार्फत कोणतीही विकास कामे झालेली नाहीत तर दरवर्षी हा विकास निधी रेकॉर्डवर खर्च केल्याचे दाखवले जाते. यावरुन स्थानिक पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी हे संगनमत करून या निधीचा 'कागदावरच स्वाहा' करीत असून यामध्ये अजून कोण कोण या संगनमता मध्ये सामील आहेत हे ही बघणे गरजेचे असून याबाबत अर्धापूर तालुक्यात 'कागदं फिरवा अन् पैसे जिरवा' असा एकमेव कार्यक्रम सुरू असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.शासनाच्या वतीने दरवर्षी वित्त आयोगाचा निधी नियमित मंजूर होतोय.मागील वर्षी अर्धापूर तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयात तेरावा व चौदावा वित्त आयोगाचा लाखो रूपयांचा विकास निधी केवळ कागदावरच कामे दाखवून फस्त करण्यात आल्याचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर येथील काही सुज्ञ नागरिकांनी १५ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून थेट ग्राम पंचायतींना पाठविण्यात येणाऱ्या लाखो रूपयांचा निधी खर्च करण्याविषयी सखोल चौकशी केली असता ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणसाशी निगडीत ज्या काही समस्या आहेत त्या जाग्यावरच सुटल्या पाहिजेत,त्यांना अत्यावश्यक दैनंदिन व तात्पुरत्या कामासाठी वरीष्ठ कार्यालयाची वाट पाहण्याची गरज भासू नये यासाठी शासनाकडून प्राप्त झालेला विकास निधी प्रत्यक्षात विकास कामावर खर्च न होता स्थानिक पदाधिकारी,अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने फक्त रेकॉर्ड मेंटन करुन खर्च केला जातोय यांची खात्री पटली आहे आणि यामध्ये अजून कोण कोण या संगनमता मध्ये सामील आहेत हे ही बघणे गरजेचे असून यावरून अर्धापूर तालुक्यात वित्त आयोगाच्या निधी खर्चासाठी 'कागदं फिरवा अन् पैसे जिरवा' अशी मोहीमच सुरू झाल्याचे बोलल्या जात आहे.या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक ग्रामपंचायतीला दिला जाणारा वित्त आयोगाचा निधी कुठे खर्च करण्यात आला आहे याची प्रत्यक्ष पाहणी करून चौकशी करावी आणि यातील संपूर्ण दोषींवर ताबडतोब कठोर कार्यवाही दाखल करण्यात यावी अशी मागणी ग्रामीण जनतेतून करण्यात येत आहे.

# नायलॉन मांजा वापरल्यास होणार जेल; तळोदा पोलिसांचा कडक इशारा

## शहरातील शाळांमध्ये 'सायबर सुरक्षा' आणि 'नायलॉन मांजा' विरोधी जनजागृती मोहीम संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

पतंगोत्सवाच्या आनंदाला नायलॉन मांजामुळे कोणाच्याही आयुष्याचे ग्रहण लागू नये, यासाठी तळोदा पोलीस प्रशासन आता क्शन मोडवर आले आहे. नायलॉन मांजा वापरल्यास कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा सज्जड इशारा पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी दिला आहे. तळोदा पोलिसांतर्फे शहरातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते.

स्थानिक नेमसुशील शैक्षणिक समूहात आयोजित या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी विद्यार्थ्यांना नायलॉन मांजाचे भीषण परिणाम समजावून सांगितले. हा मांजा केवळ पक्षांसाठीच नव्हे, तर दुचाकीस्वार आणि नागरिकांसाठीही जीवघेणा ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी 'नायलॉन मांजा कधीही वापरणार नाही' अशी सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

यावेळी केवळ मांजाच नव्हे, तर वाढत्या सायबर गुन्ह्यांवरही पोलिसांनी प्रकाश टाकला. सोशल मीडियाचा वापर करताना विद्यार्थ्यांनी, विशेषतः मुलींनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीने पाठवलेली लिंक ओपन करू नका, असे आवाहन मोरे यांनी केले. ऑनलाइन फसवणूक, सायबर क्राईम आणि बाल गुन्हेगारीपासून स्वतःचा बचाव कसा करावा, याचे तंत्रही यावेळी विद्यार्थ्यांना शिकवण्यात आले.पोलीस निरीक्षक मोरे यांनी पुढे माहिती दिली की, ही मोहीम तालुक्यातील प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात राबवली जाणार आहे. जर कोणत्याही विद्यार्थ्यासोबत सायबर छळ किंवा ऑनलाइन फसवणुकीचा प्रकार घडला, तर न घाबरता पोलिसांची मदत कशी मिळवावी, याचे प्रशिक्षण आम्ही देत आहोत.या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष निखिल तुरखीया, हवालदार विजय सोनवणे, पोलीस नाईक अनिल पाडवी, मुख्याध्यापिका पुष्पा बागुल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन शिक्षक अरुण कुंवर यांनी केले.

यासंदर्भात तळोदा पोलीस दलातर्फे दिनांक १८ रोजी तळोदा शहरात नायलॉन मांजाच्या दुष्परिणामा बाबत जनजागृती रॅलीचे देखील आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली सकाळी दहा वाजता निघणार असल्याचे पोलीस दलातर्फे सांगण्यात आले आहे. यावरून नायलॉन मांजा प्रतिबंधा विषयी तळोदा पोलीस दल किती संवेदनशील आहे हे कळून येत आहे. तसेच तळोदा पोलीस निरीक्षक राजन मोरे यांनी विविध पतंग विक्रेत्यांच्या दुकानावर जाऊन नायलॉन मांजा संदर्भात चौकशी देखील केली आहे आणि दुकानदारांना नायलॉन मांजा आपल्या दुकानात विक्रीसाठी ठेवू नये असे आवाहन देखील केले आहे. जर कोणा दुकानदाराकडे नायलॉन मांजा आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल असा इशारा देखील दुकानदारांना देण्यात आला आहे.



# सारंगखेडा चेतक महोत्सवात अश्वांच्या आरोग्यासाठी 'कवच'; पशुसंवर्धन विभागाकडून १३ पथके तैनात

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या सारंगखेडा (ता. शहादा) येथील दत्त जयंती यात्रेनिमित्त भरणाऱ्या दक्षिण भारतातील सर्वात मोठ्या अश्वबाजारात यंदा पशुसंवर्धन विभागाने आरोग्याची तटबंदी उभारली आहे. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली, सुमारे ३ हजार अश्वांच्या देखभालीसाठी आणि ग्लँडर्ससारख्या घातक आजाराच्या प्रतिबंधासाठी व्यापक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

यंदाच्या यात्रेत ४ डिसेंबर ते २६ डिसेंबर २०२५ या कालावधीत अश्वांना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी यासाठी एकूण १३ विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकामध्ये:

१ पशुधन विकास अधिकारी

१ सहाय्यक पशुधन विकास अधिकारी/पर्यवेक्षक

१ वर्णोपचारक किंवा परिचर

यांचा समावेश आहे. ही पथके दर दोन दिवसांच्या रोटेशननुसार अहोरात्र कार्यरत आहेत.अश्वांमध्ये आढळणारा ग्लँडर्स हा संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी विभागाने कंबर कसली आहे. यात्रेतील सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आतापर्यंत सुमारे ६०० अश्वांचे रक्तनमुने संकलित करण्यात आले आहेत. या सिरोमॉनिटरिंग प्रक्रियेमुळे आजाराचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीच त्यावर नियंत्रण मिळवणे शक्य होणार आहे.यात्रेच्या सुरुवातीच्या काळातच या पथकांनी आपली तत्परता सिद्ध केली आहे. आतापर्यंत विविध कारणांमुळे आजारी पडलेल्या १५० अश्वांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. यामध्ये केवळ औषधोपचारच नव्हे, तर काही तातडीच्या किरकोळ शस्त्रक्रियाही यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या आहेत.

विशेषतः अश्व शर्यती आणि विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या घोड्यांची सखोल शारीरिक तपासणी केल्यानंतरच त्यांना मैदानात उतरण्याची परवानगी दिली जात आहे.लाखो रुपयांची उलाढाल होणाऱ्या या अश्वबाजारात घोड्यांचे आरोग्य ही मालकांसाठी सर्वात मोठी चिंता असते. मात्र, शासनाने उपलब्ध करून दिलेल्या या मोफत आणि दर्जेदार सुविधांमुळे अश्वमालक, व्यापारी आणि यात्रेकरूंमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यामुळे सारंगखेडा यात्रेचा डौल आणि शिस्त अधिक वृद्धिंगत झाली आहे.




# विजचोरी प्रकरणातील आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर ; ॲड.सुनीता देशपांडे–जोशी यांच्या प्रयत्नांना यश

दैनिक वादळ वार्ता

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

केज येथील एका व्यावसायिकावर दाखल करण्यात आलेल्या वीज चोरीच्या गुन्ह्यात अटक पूर्व जामीन मंजूर करण्यात आला असून, या प्रकरणात आरोपीच्या वतीने प्रभावीपणे बाजू मांडणाऱ्या ॲड.सुनीता देशपांडे–जोशी यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

या प्रकरणात आरोपीस अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी ॲड.सुनीता देशपांडे – जोशी यांनी न्यायालयासमोर वस्तुनिष्ठ व कायदेशीर मुद्द्यांच्या आधारे बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा सविस्तर युक्तिवाद ऐकून जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायमूर्ती मा.डॉ.रचना नेहरा यांनी आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर केला.या निर्णयामुळे संबंधित व्यावसायिकाला मोठा दिलासा मिळाला असून,ॲड.सुनीता देशपांडे –जोशी यांच्या कायदेशीर कौशल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या यशस्वी प्रयत्नांमुळे न्यायालयीन प्रक्रियेत योग्य न्याय मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.



# पोथरा येथील काशेश्वरी भजनी मंडळाचे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य

दैनिक वादळ वार्ता

**चौसाळा | प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील असलेल्या पोथरा येथील काशेश्वरी भजनी मंडळ हे गावातील महिला व पुरुष यांनी एकत्र येऊन भजनी मंडळाची स्थापना केली असून याची अधिकृत नोंदणी देखील केलेली असून याचा र. जि. क्र.१६ ८७५ हा आहे. या भजनी मंडळातील पेटी मास्तर व भजनी मंडळाचे अध्यक्ष अश्रुबा हावळे,मृदंगाचार्य मधुकर लंबाटे, गायनाचार्य विष्णू खनाळ,केशरबाई खनाळ,केशर बाई हावळे, चंद्रकला कांबळे, साखरबाई काळे, कालींदाबाई तातूडे इत्यादी सदस्य हे चांगल्या प्रकारे गायन करतात व ते आपल्या कलेतून संगीत भजन हरिपाठ हरी किर्तन समाजात समाज प्रबोधन व्यसनमुक्ती स्त्रीभ्रूणहत्या सामाजिक बांधिलकी अंधश्रद्धा निर्मूलन या माध्यमातून गेली ३५ वर्ष समाजसेवा करत आहे त्यांना परिसरातील अनेक गावातून हरिनाम सप्ताह जागर विविध ग्रंथ समाप्तीसाठी या भजनी मंडळास आमंत्रित केले जाते हे सर्व कलावंत उत्तम प्रकारे अभंग गवळणी भारुड या प्रकारे गायनाद्वारे सादर करून कार्यक्रम पार पाडतात पेटी मास्तर श्री अश्रुबा हावळे यांच्या मार्गदर्शनाने हे भजनी मंडळ कला सादर करत आहे त्यांना महाराष्ट्र शासनाच्या वृद्ध कलावंत मानधन योजनेचा लाभ मिळावा असे काशेश्वरी भजनी मंडळ पोथरा या भजनी मंडळातील सदस्य यांनी मागणी केली आहे.



# शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठानची सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न;सचिवपदी एच बी जंगम यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र यांची सर्वसाधारण सभा आज मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेले अनेक नामवंत कलाकार, पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला प्रतिष्ठानच्या गेल्या वर्षभरातील सामाजिक व सांस्कृतिक कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यानंतर भविष्यातील उपक्रमांबाबत विविध विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. राज्याच्या प्रत्येक जिल्हा व तालुक्यात संगीत विद्यालय सुरू करण्याच्या उद्देशाने काही दानशूर व्यक्तींनी आपली काही गुंठे जागा बक्षीस स्वरूपात दिल्याबद्दल त्या मान्यवरांचा प्रतिष्ठानच्या वतीने सन्मान करण्यात आला.या सभेत महत्त्वाचा निर्णय घेत प्रतिष्ठान स्थापनेपासून कार्यरत असलेले सचिव जगदीश मरगजे यांची नियुक्ती रद्द करून त्यांच्या जागी प्रतिष्ठानमधील ज्येष्ठ सदस्य श्री. हरिशश्चंद्र(एच.बी) जंगम यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राजाराम बुवा शेलार, नवनिर्वाचित सचिव एच. पी. जंगम, खजिनदार सुरेश धर्मा पाटील, ड. प्रल्हाद भिलारे, दिग्दर्शक संदीप जाधव, विनोद शिंदे, संभाजीनगरचे मोरे साहेब, ड.साईश जाधव, शालिनीताई म्हात्रे, संगीता गीते, मळवी मॅडम, आशिष शिंदे, व्यवस्थापक म्हणून निवड झालेले निवृत्ती पाटील, महेश निवळे, अशोक कदम, प्रकाश उतेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.सभेच्या शेवटी आशिष शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले



# गांजपूर सरपंचाच्या विरोधात खोडसाळ पणाने केलेले अपील फेटाळले

दैनिक वादळ वार्ता

**किल्ले धारूर | प्रतिनिधि**

लोकशाही मध्ये राजकारण म्हटल की विरोधी पक्ष आलाच परंतू विरोधक न्याय नितीचा असेल तर निकोप लोकशाहीत जनतेचा विकास होईल.परंतू द्वेश पुर्ण व स्वार्थापोटी केला विरोध असेल तर विकासाला खीळ बसते हे नक्कीच. स्थानिक स्वराज्य संस्थेत राखीव जागेवर निवडून आलेल्या उमेदवारांनी एक वर्षात आपले जात वैधता प्रमाणपत्र निवडणूक विभागात दाखल करावे असा शासन निर्णय होता.एक वर्षात जात वैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या सरपंच,सदस्य यांना मा.जिल्हाधिकारी,बीड यांनी दि.२० डिसेंबर २०२४ च्या आदेशाने अपात्र ठरवले होते.महाराष्ट्रातील अपात्र सरपंच व सदस्यासाठी सरपंच परिषद मुंबई चे अध्यक्ष दत्तात्रय काकडे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते प्रा.ईश्वर मुंडे व इतरांनी शासनाकडे पाठपुरावा केल्याने शासनाने जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यास महामहीम राजीयपाल यांनी दि.३० एप्रिल २०२५ रोजी अध्यादेश काढून सर्व अपात्र सरपंच व सदस्य यांना तेथून पुढे एक वर्ष मुदत वाढ देण्याचा अध्यादेश काढला होता. त्या नुसार मा.जिल्हाधिकारी,बीड यांनी पुर्वी कार्यरत सरपंच व सदस्य यांना दि.८ जून २०२५ च्या आदेशाने पात्र ठरवून सर्वांना मुळ पदावर कायम ठेवले होते. या मध्ये गांजपूर च्या सरपंच श्रीमती कस्तूराबाई साला पवार यांचा ही समावेश होता.त्यांना जात वैधता प्रमाणपत्र एक वर्षानंतर मिळाले होते ते त्यांनी निवडणूक विभागात दाखलही केले होते.परंतू मागासवर्गीय सरपंच,सदस्य यांना कमी समजून त्यांना लोकशाहीच्या मुळ प्रवाहात येऊ द्यायचे नाही व आम्हीच सरपंच म्हणून मिरवणाऱ्या गांजपूर येथील उप सरपंच सुनील गोविंद डापकर यांनी मा.जिल्हाधिकारी,बीड यांच्या आदेशाला आव्हान देत मा.अप्पर आयुक्त, संभाजीनगर यांचे कडे अपील दाखल केले होते.



सर्व पक्षकारांना योग्य वेळ देऊन व सर्वांची बाजू ऐकून मा.जिल्हाधिकारी,बीड यांचा दि.८ जून २०२५ चा आदेश कायदेशीर व योग्य आहे त्यामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज नाही असे म्हणून दि.४ डिसेंबर २०२५ रोजी अपील फेटाळून लावले आहे.या मुळे सत्याचा विजय झाला.सत्य परेशान आहे पराजित नाही अशी भावना व्यक्त करून मला जनतेने पाच वर्षासाठी निवडून दिलेले आहे या कालावधीत आपण विरोधकांना न जुमानता विकासाची व जन हिताची कामे करतच राहाणार अशी प्रतिक्रीया गांजपूर च्या लोकनियुक्त सरपंच श्रीमती कस्तूराबाई साला पवार यांनी माध्यमांकडे व्यक्त केली आहे. सरपंच श्रीमती कस्तूराबाई साला पवार यांच्या वतीने संभाजीनगर येथील प्रसिद्ध विधिज्ञ श्रीमंत मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ऍड.अमोल व्यंकटराव चाटे यांनी बाजू

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ३९ हजार २५४ प्रकरणे निकाली; ४६ कोटी ५२ लाख रुपयांची वसूली

## राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचा महाराष्ट्रात चौथा क्रमांक

दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर बार असोसिएशन व सेंट्रल बार असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा न्यायालय, तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालत संपन्न झाली. या लोकअदालतीमध्ये ३९ हजार २५४ इतकी प्रकरणे निकाली निघून ४६ कोटी ५२ लाख ६८ हजार ५८८ रुपयांची वसूली करण्यात आली. राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याचा राज्यात चौथा क्रमांक आला असल्याची माहिती जिल्हा विधी प्राधिकरणाचे सचिव योगेश पैठणकर यांनी दिली.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय लोकअदालत यशस्वीरित्या संपन्न झाली. सर्व न्यायालयांतील दिवाणी व फौजदारी प्रकरणे, धनादेश (चेक) संदर्भातील प्रकरणे, बँकेची कर्ज वसूली प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, कामगार न्यायालयांतील प्रकरणे, कौटुंबिक वादाची प्रकरणे, वीज महावितरणाची समझोता योग्य प्रकरणे तसेच न्यायालयात येण्याअगोदरची दाखलपूर्व प्रकरणे आपसातील समझोत्यासाठी या लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जिल्ह्यातील ३६ हजार ९१७ दाखलपूर्व प्रकरणे मिटविण्यात आली, तर २ हजार ३३७ प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. विशेष मोहिमेमध्ये १ हजार १८१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकअदालतीमध्ये ४६ कोटी ५२ लाख ६८ हजार ५८८ इतक्या रकमेची वसूली झाली आहे. आजपर्यंत झालेल्या सर्व लोकअदालतींपेक्षा या लोकअदालतीमध्ये अधिक प्रकरणे निकाली काढण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077